महाराष्ट्र शासन

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १०००३६, मुंबई ४०० ००१

www.dvet.gov.in ; desk7@dvet.gov.in ; ०२२-२२६२०६०४/२९३

क्र. ७/ खाऔप्रसंस्था/संलग्नता/ २०२४/१८९ दिनांक १५/०३/२०२४

## प्रसिध्दीपत्रक

**औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या संलग्नतेकरीता ऑनलाईन अर्ज मागविणेबाबत.**

केंद्रशासनाच्या डिजीटी नवी दिल्ली यांचेकडून औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या संलग्नतेकरीता इच्छुक संस्थांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत असुन नवीन खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विद्यमान शासकीय व खाजगी संस्थेत नवीन व्यवसाय,तुकडीवाढ, संस्थेच्या नांवात/पत्यात बदल, नवीन जागेत संस्था स्थलांतरण, विद्यमान संस्था/तुकडी नि:संलग्नीकरण व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील SCVT अभ्यासक्रमांचे NCVT मध्ये रुपांतर करणे इ. करीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करु शकतात. ज्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना राज्यशासनाचे वैध इरादापत्र/शासन मान्यता प्राप्त आहे (State NOC) अशाच संस्थांनी संलग्नतेकरीता अर्ज करावा. राज्यशासनाचे वैध इरादापत्र/शासन मान्यता (State NOC) नसलेल्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे अर्ज नाकारण्यात येतील यांची नोंद घ्यावी. ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा खालील संकेतस्थळावर दिनांक १५.०३.२०२४ उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता संकेतस्थळ:** https://nimionlineadmission.in/iti/new_index/

**अर्ज करण्याची अंतिम मुदत : दि. ३० एप्रिल २०२४**

ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती, संस्था व व्यवसाय सुरु करण्यास आवश्यक मानके यांचा सविस्तर तपशिल वरील अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही /-

(दि.अं. दळवी)
संचालक